जळगाव दि.२६ (प्रतिनीधी) : ज्या देशाकडे युवा शक्ती मोठ्या प्रमाणात आहे त्या देशाचे भविष्य उज्ज्वल असते. हा इतिहास लक्षात घेता भारताकडे सद्या युवाशक्तीचे प्रमाण मोठे असल्यामुळे भारत हा नक्की महासत्ता होईल असा विश्वास केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री ना. रक्षाताई खडसे यांनी व्यक्त केला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आज युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय भारत सरकार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष मंत्रालय मुंबई यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना कार्यगौरव पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावर कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्रा. महेंद्र रघुवंशी, प्रा. सुरेखा पालवे, प्रा. अनिल डोंगरे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, अधिसभा सदस्य नितीन ठाकूर, अमोल मराठे, अमोल सोनवणे, स्वप्नाली काळे, डॉ. मंदा गावीत, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यापीठाच्या ३५ वर्षाच्या कार्याचा आढावा घेणारी चित्रफीत दाखविण्यात आली.

यावेळी बोलतांना ना. खडसे म्हणाल्या की, विद्यापीठासारखी शैक्षणिक संस्था हा एक मोठा अधारस्तंभ आहे की ज्या माध्यमातून आपण येणाऱ्या भविष्यातलं एक भवितव्य ठरवत असतो आज त्याच अनुषंगाने रा.से.यो. अंतर्गत खूप मोठे कार्य तुमच्या माध्यमातून आपल्या देशाच्या विकासासाठी व सेवेसाठी तुम्ही करत आहात. आजपर्यंत आपल्या भारतात आपण बघितलं असेल की रा.से.योच्या माध्यमातून असे अनेक मोठे मोठे उपक्रम आणि कार्य झालेले आहेत. कोविडच्या काळामध्ये आपल्यासारखे हजारो तरुणांनी जीवाची पर्वा न करता अतिशय जोखिमीने मदतीचा हात पुढे केला होता. आजचा युवा स्टार्टअप, मेक इन इंडिया, रासेयो, एज्युकेशन, स्पोर्टस असे एकही क्षेत्र नाही की त्यात युवांचा सहभाग नाही. कोणत्या ना कोणत्या माध्यमातून आजचा युवक हा प्रत्येक क्षेत्राशी कनेक्ट आहे आणि कनेक्ट असण पण गरजेचे आहे. आपला देश ज्या पद्धतीने युवांना घेऊन विचार करतोय की येणाऱ्या २०४७ पर्यंत जेव्हा शंभर वर्ष देशाला स्वातंत्र्य मिळून होतील त्यावेळेस आपल्या सगळ्या लोकांना सुद्धा अभिमान वाटला पाहिजे की माझे ही ह्या देशाच्या विकासामध्ये योगदान होतं. देशाच्या विकासासाठी युवांचा रा.से.यो. मध्ये सहभाग हा मेजर रोल आता प्ले होणार असून रा.से.यो. हे छोटे व्यासपीठ नसून खूप मोठे व्यासपीठ आहे तेव्हा यात युवांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा असेही आवाहन यावेळी त्यांनी केले.

व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी यावेळी सांगितले की, भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या योजना असतात त्या पूर्ण करण्यात विद्यापीठ कधीही मागे सरसावत नाहीत तर त्या पूर्ण करण्यात झोकूण देत असते. तेव्हा विद्यार्थी विकासासाठी व भारत बलशाली होण्यासाठी केंद्रातील रासेयोच्या ज्या योजना असतील त्या विद्यापीठाला उपलब्ध करून दिल्यास विद्यापीठाचा स्तर निश्चितच उंचावला जाईल.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी म्हणाले की, रासेयोच्या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी, सामाजिक संवेदना, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण हे गुण आहेत ते वाढीस लागण्यासाठी रासेयो नेहमी कार्यशील असते. ज्या ज्या संचालक, कार्यक्रम अधिकारी, समन्वयक, स्वयंसेवक यांनी चांगले काम केलेले आहेत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप भरण्यासाठी आपण हा सोहळा आयोजित केलेला असून आता त्यांची जबाबदारी वाढते असल्याचे त्यांनी सांगितले.

रासेयो संचालक, प्रा. सचिन नांद्रे यांनी कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली, सुत्रसंचालन डॉ. दिनेश पाटील, प्रा. सुरेखा बनसोडे यांनी तर आभार कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी मानले. कार्यक्रमापुर्वी क्रीडा संकुलाला भेट दिली.

**शै. वर्ष २०२२१ -२२ व २०२२-२३ मधील राज्यस्तरीय रासेयो कार्यगौरव पुरस्कार पुढील प्रमाणे** – १) डॉ. पंकजकुमार नन्नवरे, सर्वोत्कृष्ट राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा संचालक / समन्वयक २) डॉ. दिनेश पाटील, राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, ३) अ.र.भा. गरूड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी सर्वोत्कृष्ट रा.से.यो. एकक ४) श्री. विलास पाटील, राज्यस्तरीय उत्कृष्ट रा.से.यो. समन्वयक ५)डॉ. अनिल बारी, राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, ६) दि. बोदवड सार्वजनिक को.ऑप एज्यु. सोसा. मर्या. बोदवड संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड, उत्कष्ट रासेयो एकक, ७) श्री. जयेश साळुंखे राज्यस्तरीय उत्कृष्ट रासेयो समन्वयक

**शै. वर्ष २०२२-२३ मधील विद्यापीठस्तरीय रासेयो उत्कृष्ट एकक पुढील प्रमाणे** – १) ग्राम विकास संस्थेचे कला महाविद्यालय, बामखेडा, २) सौध्दारक विद्यार्थी संस्थेचे दादासाहेब रावळ कला व विज्ञान महाविद्यालय, दोंडाईचा ३) दि. बोदवड सार्वजनिक को.ऑप एज्यु. सोसा. मर्या. बोदवड संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड

**रासेयो उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुढील प्रमाणे** – १) प्रा.छबीलदास करंके, ग्राम विकास संस्थेचे कला महाविद्यालय, बामखेडा, २) प्रा. कैलास चौधरी, सौध्दारक विद्यार्थी संस्थेचे दादासाहेब रावळ कला व विज्ञान महाविद्यालय, दोंडाईचा ३) डॉ. अनिल बारी, दि. बोदवड सार्वजनिक को.ऑप एज्यु. सोसा. मर्या. बोदवड संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड

**रासेयो उत्कृष्ट स्वयंसेवक पुढील प्रमाणे** – १)राम ठाकरे, जी.टी.पी महाविद्यालय, नंदुरबार, २) वृंदावणा पाटील, डॉ.पी.आर. घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे, ३) जयेश साळुंखे, सामाजिक शास्त्रे प्रशाळा, कबचौ उमवि, जळगाव.

**बातमी नं. २**

जळगाव दि.२६ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्तीकक्ष व युनिर्व्हसिटी इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलाजी अंतर्गत आयोजित बी.टेक केमिकल इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांच्या परिसर मुलाखत घेण्यात आल्या.

विद्यापीठाती केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्तीकक्ष व युनिर्व्हसिटी इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलाजी अंतर्गत आयोजित बी.टेक केमिकल इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांच्या परिसर मुलाखत  आयनॉक्स एअर प्रोडक्ट्स लि. मुंबई या कंपनीतर्फे १७ विद्यार्थ्यांच्या टेस्ट व मुलाखती घेण्यात आल्या. परिसर मुलाखतीस कंपनीची टीम व एचआर मॅनेजर अनिल ढाले यावेळी उपस्थित होते. या मुलाखतीत ३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यात अनुक्रमे प्रितम भरड,भूषण वाघ, रेणुका जाधव या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या मुलाखतीसाठी युनिर्व्हसिटी इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलाजी, केमिकल इंजिनीअरींगी विभागाचे प्रमुख व केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक डॉ.उज्वल पाटील, केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा.रमेश सरदार व प्लेसमेंट ऑफिसर श्रीमती सोनाली दायमा यांनी व्यवस्थापन केले. या विद्यार्थ्यांचे मा.कुलगुरु महोदय प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, युनिर्व्हसिटी इन्स्टियूट ऑफ केमिकल टेक्नॉलाजीचे संचालक प्रा. जयगिरी गोस्वामी, डॉ.राजकुमार शिरसाम यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

..........................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २६ डिसेंबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता